# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
## निवडणूक २०१७
## जाहीर सूचना

सर्व संबंधितांना या निवडणूक सूचनेद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठ प्राधिकरणांच्या निवडणुकासंबंधी विविध निर्वाचक गणांच्या [१) अध्यापक २) प्राचार्य ३) विद्यापीठ अध्यापक ४) व्यवस्थापन प्रतिनिधी ५) संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांचे विभागप्रमुख ६) विद्यापीठ पदवीधर] प्रारूप वा दुरुस्त मतदार याद्या विद्यापीठाच्या www.bamu.ac.in या संकेतस्थळावर Election-2017 या लिंकवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. उपरोल्लेखित अ.क्र. १ ते ५ गणांसंबंधी मा. कुलगुरूंना अपील सादर करण्यासाठी आणि 'विद्यापीठ पदवीधर' गणासंबंधी चुकीच्या किंवा वगळलेल्या नोंदी कुलसचिवांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी **शनिवार, दि. २१-१०-२०१७ संध्या. ०५.०० पर्यंत (१९ व २० ऑक्टोबर, २०१७ हे २ दिवस वगळून) मुदतवाढ देण्यात येत आहे.**

**'विद्यापीठ पदवीधर' गणासंबंधी असे सूचित करण्यात येते की, महिला अर्जदारांच्या बाबतीत,** अर्जावरील नाव पदवीवरील नाव आणि पत्त्याच्या पुराव्यावरील नाव (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना यापैकी एक पुरावा) जुळत नसल्यास, **त्यांनी विद्यापीठाच्या www.bamu.ac.in या संकेतस्थळावर Election-2017 या लिंकवर उपलब्ध असलेले हमीपत्र Download करून, पूर्ण भरून, त्यावर फोटो चिटकवून, सहीनिशी मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर केंद्राध्यक्षांना सादर करावे, त्यानंतरच मतदान करता येईल.** ह्या हमीपत्राशिवाय छायाचित्र असलेला ओळख पुरावासुद्धा आणणे आवश्यक आहे.

कृपया सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

B.chopade
17/10/2017

**कुलगुरू तथा**
**अपिलीय अधिकारी**

संदर्भ क्र. निवडणूक/२०१७/
दिनांक :- १७-१०-२०१७